स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविज्ञान विद्याशाखे अंतर्गत 'इतिहास' विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर करावयाचा संशोधन आराखडा

महाराणी दुर्गावती यांचे जीवन कार्य : एक ऐतिहासिक अभ्यास

❁ संशोधक ❁

गजानन रामचंद्र गेडेवाड

(एम. ए. इतिहास नेट सेट)

❁ मार्गदर्शक ❁

श्री प्रा.डॉ. एन.जी. भद्रे

(एम. ए. इतिहास पी. एच डी.)

इतिहास विभाग प्रमुख

संशोधन केंद्र

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड

2 0 2 2

संशोधन आराखडा (संशोधनाची रूपरेषा)

संशोधन विषय –

<u>महाराणी दुर्गावती यांचे जीवन कार्य : एकऐतिहासिक अभ्यास</u>

1) प्रस्तावना
2) संशोधन विषयाची उद्दिष्टे
3) संशोधन विषयाची आवश्यकता
4) संशोधनाची गृहीततत्वे
5) संशोधन पद्धती
6) संशोधनाची वर्गवारी
7) संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा
8) आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा
9) संशोधन विषयाचे महत्व
10) संदर्भ सूची

महाराणी दुर्गावती यांचे जीवन कार्य : एकऐतिहासिक अभ्यास

प्रस्तावना –

भारतीय संस्कृती एकाहून एक महान सेनानी व वीरांनी बहरलेली आहे. मध्ययुगीन कालखंडात अनेक परकीय आक्रमणे भारतावर होत होती. एवढ्या मोठ्या खंडप्राय भारत देशात अनेक राज्य अस्तित्वात होती. प्राचीन भारतात संपूर्ण भारत वर्ष एकछत्री राज्य निर्माण करण्याचे कार्य मौर्यांनी व नंतर गुप्तांनी केले पण मध्ययुगीन काळात असे होण्यासाठी खूपच संघर्ष झाला तरीही सर्वस्वी संपूर्ण अमल झाला नाही. उत्तर भारतात राजपुतांनी आपले राज्य अबाधित ठेवण्यासाठी खूप संघर्ष केला आहे.

या संघर्षाच्या काळात आपल्या राज्याचे अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी कार्य केलेल्या महान व्यक्तींच्या पंक्तिमध्ये महाराणी दुर्गावती यांचा उल्लेख करावाच लागतो. मोठ-मोठ्या संघर्षाचा सामना करत आपले अस्तित्व व अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी जीवाची पर्वा महाराणी दुर्गावती यांनी केली नाही. नुसतेच राज्य केले नाही तर ते भरभराटीसही आणले व गोंडवाना प्रदेशाला एक महान साम्राज्य म्हणून नावलौकिक प्रदान केला. भारतीय स्त्रीच्या उदरात लपलेल्या असिम शक्तीचे दर्शन महाराणी दुर्गावती यांच्या चरित्रावरून पहावयास मिळते. राजपूत वंशाच्या चंदेल घराण्यात त्यांचा जन्म झाला तरी त्यांचा विवाह हा आदिम-आदिवासी समजल्या जाणाऱ्या गोंड राजघराण्यात झाला. हेही त्याकाळची मोठी सामाजिक क्रांती होती. गोंड व चंदेल राजघराणे एकत्र आल्यामुळे परकीय आक्रमणांना एक धाक बसला होता. परंतु वडील व पती यांच्या असमयी मृत्युमुळे महाराणी दुर्गावती यांना स्वतः प्रत्यक्ष राज्यकारभार करावा लागला आणि मोठ्या हिमतीने त्यांनी गोंड घराणे व चंदेल घराण्याचा वारसा चालवला आहे. उत्तर मध्य भारतात निर्माण झालेल्या ह्या गोंडवाना साम्राज्याबद्दल अनेक परकीय आक्रमकांनी लौकिक ऐकून हे साम्राज्य मिळवण्याचा प्रयत्न केला. महाराणी दुर्गावती ह्यांनी हे सर्व आक्रमण मोडीत काढीत साम्राज्य समृद्ध ठेवले. राणी दुर्गावती यांच्यामुळे त्यांच्या वंशपरंपरागत धैर्य परंपरेला मोठी प्रतिष्ठा लाभली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे —

1. गोंडवाना साम्राज्याचे मध्ययुगीन काळातील महत्त्व व वैशिष्ट्ये समजून घेणे. तत्कालीन साम्राज्याची सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्थिति समजून घेणे.
2. महाराणी दुर्गावती यांचा संपूर्ण जीवन परिचय प्रस्तुत करणे त्यांच्या जीवन चरित्र वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
3. अनेक संकटांचा सामना करूनही अलौकिक राज्य निर्माण करून तत्कालीन इतर राज्यांना प्रेरणा देण्याच्या महाराणी दुर्गावती यांच्या कार्याचा अभ्यास करणे.
4. महाराणी दुर्गावती व गोंडवाना साम्राज्य यांच्या नीती कौशल्य व युद्धकौशल्य यांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
5. प्रतिकूल परिस्थितीतही आपले कर्तुत्व सिद्ध करून स्व अस्तित्व निर्माण करण्याची प्रेरणा आजही आजच्या पिढीला कशी प्राप्त होईल ते प्रकट करणे.
6. सामाजिक असमानता वंशद्वेष व स्त्रीत्व कडे पाहण्याचा दृष्टिकोन या अनिष्ट गोष्टी असूनही सामर्थ्य हेच विरत्वाचे निकष आहे ही प्रेरणा महाराणी दुर्गावती यांच्या चरित्रावरून स्पष्ट करणे.

संशोधन विषयाची आवश्यकता —

इतिहास हा भूतकाळातील घटनांचा केवळ घेतलेला मागोवा एवढाच असतो असे नाही तर इतिहासाची प्रेरणा घेऊन सध्याच्या वर्तमानातील आचरण आणि भविष्यातील परिस्थितीचा अंदाज घेता येतो त्यामुळे इतिहासाचा अभ्यास हा अत्यावश्यकच बनतो तो विसरून चालणार नाही म्हणून जॉर्ज संतयना इतिहासाबद्दल पुढील वक्तव्य करतात.

“Those who forget their history are condemned to repeat the mistakes”

त्याच त्याच चुका न करता स्वतःची समाजाची अतः देशाची प्रगती करावयाची असल्यास इतिहास अभ्यासणे आवश्यक आहे.

मध्ययुगीन काळात स्त्रियांकडे व त्यांच्या कर्तृत्वाचा कडे पाहण्याचा दृष्टिकोन दूषित होता. त्यांना प्रत्येक क्षेत्रात कमी समजले जात असे. हा दृष्टिकोण पुर्णपणे उपटून काढण्याचे कार्य महाराणी दुर्गावती यांच्या

जीवन चरित्रामध्ये दिसते. त्यांची रोमहर्षक जीवन कहाणी आजही आजच्या पिढीसाठी अत्यंतिक प्रेरणादायी आहे. सामाजिक असमतेचा धिक्कार, वंश द्वेषाची भावना, याविरुद्ध त्यांचे विचार त्यांच्या चरित्रातून प्रकट होतात. माणूस हा जन्माने नाही तर कर्तुत्वाने महान होतो अशी त्यांची संकल्पना होती. “राज्य लोकांवर नाही तर लोकांच्या मनावर केले पाहिजे” अशी त्यांची घोषणा प्रेरणादायी आहे. या सर्व विचारांची आज समाजाला देशाला आवश्यकता आहे. निस्सीम राष्ट्रभक्ती, लोककल्याणासाठी राज्यनिर्मिती, प्रचंड धैर्य शौर्य महाराणी दुर्गावती यांच्या व्यक्तिमत्त्वात पहावयास मिळते. म्हणून गोंडवाना साम्राज्याची महाराणी दुर्गावती यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे व त्यातून एक प्रेरणा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे.

संशोधनाची गृहितकृत्ये –

1. महाराणी दुर्गावती या राजपूत वंश तथा चंदेल घराण्यातील होते त्यांचा विवाह गोंड आदिम आदिवासी घराण्यात झाला.
2. महाराणी दुर्गावती अतिशय सुंदर नीटस होत्या त्याच प्रमाणे युद्धकौशल्यात, शिकार करण्यात ही निपुण होत्या. अल्पावधीतच पती नंतर त्यांना साम्राज्याचा कारभार करावा लागला व त्यासाठी त्या संपूर्णपणे सक्षम होत्या.
3. राज्यकारभारात त्यांनी पूर्णपणे सर्व स्त्री प्रथा सोडून, जनतेवरच नाही तर जनतेच्या मनातही राज्य केले व साम्राज्य भरभराटीस आणले. खडे सैन्य, हत्तीदळ व घोडदळ निर्माण करून साम्राज्याच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली.
4. आपल्या गोंडवाना साम्राज्याचा त्यांनी मोठा लौकिक निर्माण केला व गोंडवाना साम्राज्याची कीर्ती देशात आणि विदेशातही पोहोचू लागली.
5. गोंडवाना साम्राज्यावर वक्रदृष्टी टाकणाऱ्यांना त्यांनी जबर धडा शिकवला. अकबरा सारख्या खूप मोठ्या साम्राज्याशी त्यांचा सामना झाला त्यातही त्यांनी काही विजय मिळवले.
6. फंद फितुरीमुळे शेवटी रणांगणावर त्यांनी साम्राज्यासाठी व स्व अस्मितेच्या जोपासनेसाठी प्राणांची आहुती दिली व वीर गतीला प्राप्त झाले.

संशोधन पद्धती –

प्रस्तुत विषयांमध्ये संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब संशोधकांकडून केला जाणार आहे. प्राथमिक व दुय्यम अशा स्वरूपातील साधनांची माहिती संकलनासाठी वापर करण्यात येणार आहे. वेगवेगळ्या संदर्भाचा ही वापर करण्यात येणार आहे. लिखाणासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धती वापरली जाईल. समकालीन ग्रंथ, आधुनिक ग्रंथ, वेगवेगळ्या गॅजेट्स, वंशावळी यांचा वापर केला जाईल. सर्वेक्षण तथा मुलाखती पद्धतीचा ही आवश्यकतेनुसार प्रसंगानुरुप वापर केला जाणार आहे.

प्रकरण योजना –

प्रकरण क्रमांक ०१

गोंडवाना साम्राज्याची तत्कालीन परिस्थिती

गोंडवाना साम्राज्याची त्याकाळची ऐतिहासिक पार्श्वभूमी, साम्राज्याचा विस्तार, शाशक व शासन काळ, प्रमुख ठिकाणे, किल्ले, मंदिरे यांची माहिती दिली जाईल. गोंडवाना साम्राज्यात राहणाऱ्या गोंड प्रजाती त्यांची संस्कृती यांचीही माहिती घेतली जाईल. त्याकाळची प्रादेशिक परिस्थिती राजकीय परिस्थिती व गोंडवाना साम्राज्याचा उदय स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण क्रमांक ०२

राणी दुर्गावती व दलपतशहा

या प्रकरणांमध्ये राणी दुर्गावती यांचा जन्म, बाल्यकाळ, परिवार, शिक्षण या गोष्टी पाहण्यात येथील तथा दलपतशहा यांचा परिवार आणि राणी दुर्गावती दलपतशहा यांचा विवाह व नंतर शासन काळ या घटनांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण क्रमांक ०३

महाराणी दुर्गावती यांचा राज्यकारभार

अनपेक्षित अल्पावधी काळात राज्यकारभार हाती आल्यानंतर महाराणी दुर्गावती यांची प्रशासनातील भूमिका, त्यांचे कारभारातील कौशल्य, शेजारी राज्यांची असलेला संबंध, प्रासंगिक युद्ध, त्यांची सैन्य प्रतिभा इत्यादी माहिती या प्रकरणांमध्ये प्रकट करण्यात येईल.

प्रकरण क्रमांक ०४

महाराणी दुर्गावती यांच्या कार्यकाळातील सांस्कृतिक-सामाजिक उपलब्धी

महाराणी दुर्गावती यांच्या कार्यकाळात झालेली गोंडवाना सम्राज्याची भरभराट जनतेतील त्यांच्याबद्दलच्या सन्मान, महाराणी दुर्गावती यांची लोककल्याणाची कार्य, आर्थिक परिस्थिती, सामाजिक शिक्षण, कला व स्थापथ्य या सर्वांची चर्चा या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण क्रमांक ०५

महाराणी दुर्गावती यांचा मुघलांशी संघर्ष

या प्रकरणात गोंडवाना साम्राज्यावर झालेली आक्रमणे तथा मुघलांशी झालेल्या ऐतिहासिक युद्धांची माहिती घेण्यात येईल. महाराणी दुर्गावती यांचे रण कोशल्य तथा त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेची संकल्पना स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण क्रमांक ०६

उपसंहार : निष्कर्ष

सर्व प्रकरणाची मांडणी करून महाराणी दुर्गावती ह्यांच्या वेगवेगळ्या कार्याचा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची चर्चा करण्यात येईल. त्यांच्या जीवनचरित्रातून निर्माण होणारी प्रेरणा स्तोत्राचे विवेचन करण्यात येईल. आजच्या परिस्थितीवर महाराणी दुर्गावती यांच्या जीवन चरित्राचा प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला जाईल.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा –

प्रस्तुत विषयावरील संशोधनाचा मध्ययुगीन काळ आहे. काळानुरूप महाराणी दुर्गावती ह्यांच्या जीवनाच्या काळाची व्याप्ती संशोधनात असणार आहे. तरीही आत्ताच्या वर्तमानाशी प्रस्तुत आशयाची सांगड घातली जाईल. एका ठराविक साम्राज्याची ही माहिती असल्यामुळे गोंडवाना साम्राज्य पुरतेच संशोधन असणार आहे.

आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा –

गोंडवाना साम्राज्य आणि महाराणी दुर्गावती यांच्यावर महाराष्ट्रात मराठी मध्ये संशोधन व लेखन आढळत नाही. परंतु उत्तर भारतात हिंदी साहित्यात वृंदावन लाल वर्मा यांनी महाराणी दुर्गावती यांच्यावर अभ्यासपूर्ण व्यवस्थित ग्रंथ लिहिला आहे. उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशात महाराणी दुर्गावती यांच्यावर संशोधने

व लेखन कार्य झालेले आढळते. तरीही महाराणी दुर्गावती यांच्या महान कर्तृत्वावर आवश्यक तेवढे संशोधन आणि प्रसिद्धिकरण प्रकाशन आढळत नाही.

संदर्भ ग्रंथ

1) वृंदावन लाल वर्मा , (१९९४), महाराणी दुर्गावती , प्रभात प्रकाशन गृह, नवी दिल्ली

2) तेजपाल सिंह धामा,२०१३,महारणी दुर्गावती, हिंदी साहित्य सदन, दिल्ली

3) कृष्ण कुमार अग्रवाल, २०१२,भारत कि विरांगानाये, सरस्वती ट्रस्ट, दिल्ली

4) एम. आई. राजस्वी , २०१५, राणी दुर्गावती, मनोज पब्लिकेशन, दिल्ली

5) सुरेश मिश्र,२०१२,राणी दुर्गावती, मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी,भोपाल

6) योगेश्वर तपस्वी ,भारत के नारी रत्न , प्रकाशन विभाग सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत

7) अर्शीवादीलाल श्रीवास्तव,(डॉ),अकबर महान

8) प्रभू दयाळ मित्तल,ब्रज का इतिहास

9) तिवारी गोरेलाल, बुंदेलखंड का इतिहास, के मित्र पब्लिकेशन,अलाहबाद

10) राम्रासिया सिंह,गोंडवाना कि गौरवगाथा

11) केवल पाठक,गढ मंगला का पुरातन इतिहास

12) अनंत पाल,राणी दुर्गावती

13) शंकर दयाळ भारद्वाज,२०१८,राणी दुर्गावती एक बलिदान गाथा,प्रभात प्रकाशन

14) अबुल फजल,अकबरनामा

15) अकबरनामा, बेवरीज

16) तबकात ए अकबरी, निजामुद्दीन

17) Vincent Smith, Akbar the Great Mughal,

18) Rekha Mishra, Women in Mughal India

19) The Tabaqat-I-Akbari of Khawajah Nizamuddin Ahmad,The Asiatic society

20) S. K. Tiwari, Kamlesh Mishra, The Rajgonds

21) Basu(Dr),History of Chandellas,

22) Anant Pal, Brave Rajputs Five Illustrated Classics from India

संशोधक
गजानन रामचंद्र गेडेवाड
(एम. ए. इतिहास नेट सेट)

मार्गदर्शक
श्री प्रा.डॉ. एन.जी. भद्रे
(एम. ए. इतिहास पी. एच डी.)
इतिहास विभाग प्रमुख, संशोधन केंद्र
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
ता. बिलोली जि. नांदेड